पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन स्थलांतरीत करण्यासाठी आरे दुग्धवसाहतीतील ३५२० चौ. मी. जागा बृहन्मुंबई महापालिकेस हस्तांतरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः एएमसी-२०१२/प्र.क्र.१९४/पदुम-१० (भाग-२)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०५ मार्च, २०१८

वाचा :-

१) **शासन ज्ञापन क्र. एएमसी-२०१२/प्र.क्र. १९४/पदुम-१०, दि. ५ मार्च २०१४**
२) **मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे पत्र क्र. एम.एम.आर.सी.एल./एम.एल-३/कार डिपॉट/वॉटर लाईन/१४, दि. २२/१०/२०१४**
३) **बृहन्मुंबई महापालिका यांचे दि. १०/०२/२०१४ चे पत्र**
४) **आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्र. आदुवि-१६/०१/आरे जमीन/मेट्रो कार डेपो/प्र. क्र . ६५/२०१४/२४, दि .२/०१/२०१५**

प्रस्तावना :-

प्रस्तूत प्रकरणी आरे दुग्धवसाहतीतील ३० हेक्टर (२,९७,९००.०० चौ. मी.) जागा मुंबई मेट्रो लाईन-३ कार डेपोसाठी दि. ५/०३/२०१४ रोजीचे शासन ज्ञापनान्वये हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. सदर जागेमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या दोन पाईपलाईन आहेत. सदर पाईपलाईन आरे दुग्धवसाहतीमध्ये गट क्र. ३,५, व ६ येथे स्थलांतरीत करणेबाबत शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याची विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांचे दि.२२/१०/२०१४ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांना केली होती. पाईपलाईन स्थलांतरणाबाबत बृहन्मुंबई महापालिकेने ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे त्यांचे दि. १०/०२/२०१४ चे पत्रान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना कळविले आहे. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांनी त्यांचे दि. २/०१/२०१५ चे पत्रान्वये आरे दुग्धवसाहतीतील मुंबई मेट्रो लाईन-३ कार डेपोसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागेतील महानगरपालिकेची पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन स्थलांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता. त्याअनुषंगाने पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन ही अत्यावश्यक सेवाविषयक बाब असल्याने आरे दुग्धवसाहतीतील प्रस्तावित ३५२० चौ. मी. जागा बृहन्मुंबई महापालिकेस हस्तांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

.

शासन निर्णय:-

मेट्रो लाईन-३ चे काम सुरू झाल्यानंतर त्या परिसरातील नागरिकांची असुविधा टाळण्याच्या दृष्टिकोनातून तसेच पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन ही अत्यावश्यक सेवाविषयक बाब असल्याने दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिपत्याखालील आरे दुग्धवसाहत येथील ३५२० चौ.मी. इतके क्षेत्र बृहन्मुंबई महापालिकेस हस्तांतरीत करण्याकरीता या शासन निर्णयान्वये पूढील अटि व शर्तींच्या अधीन राहून महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात येत आहे:

१) पाईपलाईन स्थानांतरणाची व त्यासाठी येणा-या खर्चाची संपुर्ण जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची राहिल.

२) सदर पाईपलाईन १२०० मी.मी. व्यासाची व ११०० मी लांबीची आहे. त्यासाठी ३.२ मी. रुंद व २.६ मी. खोल जागेची आवश्यकता असल्याने स्थानांतरणासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या मालकीची ११०० x ३.२ = ३५२० चौ.मी. जागा देण्यात यावी.

३) सदर पाईपलाईन ही मुख्य रस्त्याच्या बाजूने पवईकडून पिकनिक जंक्शन पर्यंत ७५० मी. लांबीत व पिकनिक जंक्शन पासून मरोळ कडील बाजूने ३५० मी. लांबीमध्ये टाकण्यात यावी.

४) मरोळकडील बाजूने रस्त्याच्या दुस-या बाजूने पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित असल्याने रस्ता व पाईपलाईन यांची हद्द निश्चित करून सिमांकन करणे आवश्यक आहे. तसेच याठिकाणी अतिक्रमण होवू नये म्हणून संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे.

५) सदर पाईपलाईन ही भुमीगत टाकावयाची असल्याने सदर जागेवर भविष्यात अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची राहिल. तसेच रस्ता व पाईपलाईन यांच्या मध्ये कोणतीही मोकळी जागा सोडण्यात येवू नये.

६) पाईपलाईन स्थानांतरीत करताना आरे दुग्धवसाहतीच्या पिण्याच्या पाण्याच्या/पवई येथील पाण्याच्या जलवाहिनींना हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदर वाहिन्या स्थानांतरीत कराव्या लागल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी स्वखर्चाने करून देणे बंधनकारक राहिल.

७) पाईपलाईन स्थानांतरीत करताना पाईप, मो-या व पावसाळी पाणी वाहून नेणारे नाले यांना कोणत्याही प्रकारे बाधा होणार नाही, याची काळजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी घेणे बंधनकारक राहिल.

८) भाडेपट्टा लागू करावयाचा असल्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महापालिका यांनी कोणत्याही प्रकारचा वादंग निर्माण न करता होणारी रक्कम शासनजमा करण्याचे बंधनकारक राहिल.

९) पाईपलाईन स्थलांतरीत करण्यासाठी वापरण्यात येणा-या ३५२० चौ.मी. जागेतील वृक्षांचे नुकसान होत असल्यास, सदरील वृक्षांचे पूनर्रोपण अथवा त्यापटीने नव्याने वृक्ष लागवड करण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची राहिल.

१०) बृहन्मुंबई महापालिकेच्या दि. ४/१०/२०१७ रोजीच्या पत्रात नमूद अटी व शर्ती.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६१७२४२२८४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2018.03.06 17:25:56 +05'30'

(अशोक उईके)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (पदुम), महाराष्ट्र राज्य
४. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
६. आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका
७. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
८. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्धवसाहत, गोरेगाव (पू.), मुंबई
१०. निवड नस्ती, पदुम-१०.